# जालना जिल्ह्यातील आरोग्य सोयी- सुविधा: एक अभ्यास

**प्रा. ए. आय. खान**
भूगोल विभाग,
शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद

**प्रस्तावना:**

शासनाने लोकांच्या रोगनिवारण, आरोग्यात सुधारणा व आयुर्मानात वाढ करण्याकरीता दर्जेदार, सक्षम, सहज उपलब्ध, स्वस्थ व मोठ्या प्रमाणात संघटित उपाययोजना करणे म्हणजे सार्वजनिक आरोग्यसेवा होय. रोगप्रतिबंधक, पोषणविषयक आणि रोगनिवारक उपचार उपलब्ध करून देणे, लोकांच्या आरोग्याचे रक्षण, जतन व सुधारणा करणे हे सार्वजनिक आरोग्य सेवेचे उद्दिष्ट आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जनतेच्या मुलभूत गरजांबरोबरच आरोग्य व शिक्षण यादेखील महत्वाच्या गरजा आहेत. त्या पूर्ण करण्याचा प्रयत्न शासनाने केलेला दिसून येतो. देशातील जनतेच्या आरोग्याचे संवर्धन व जपवणूक ही सरकारची जबाबदारी असल्याने ती केंद्रसरकार व राज्य सरकार संयुक्तपणे स्विकारलेली आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये वरील विविध संस्थांमार्फत जनतेला आरोग्याच्या विविध प्रकारच्या सुविधा मोफत व अल्प दरात उपलब्ध करून दिल्या जातात. ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे व ग्रामीण रुग्णालये यांच्या मार्फत दिल्या जातात. तर शहरी भागात जिल्हा सामान्य रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, विशेष व अतिविशेष आणि महिला रुग्णालयेही आढळतात.

**अभ्यास क्षेत्र (जालना जिल्हा):**

जालना जिल्हा महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील केंद्रस्थानी असलेला जिल्हा आहे. जालना जिल्ह्याचे अक्षवृत्तीय व रेखावृत्तीय स्थान 19°15' ते 20°32' उत्तर अक्षवृत्त व 75°36' ते 76°45' पूर्व रेखावृत्त असे आहे. जिल्ह्याचा दक्षिण-उत्तर विस्तार 150 कि.मी. असून पूर्व-पश्चिम लांबी 111 कि.मी. इतकी आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस जळगाव जिल्हा, पूर्वेस परभणी, दक्षिणेस बीड आणि पश्चिमेस औरंगाबाद जिल्हा आहे. जालना जिल्ह्याचे दख्खनच्या पठारावर एक विशिष्ट स्थान आहे. अजिंठा आणि सातमाळा पर्वताच्या रांगा आणि काही नद्यांलगत प्रदेश वगळता जिल्ह्यातील जास्तीत जास्त भाग दख्खन पठारांतर्गत येतो. जिल्ह्यातील बहुतांशी भूप्रदेश सपाट प्रकारचा असल्याने येथे लोकसंख्येची घनता जास्त आढळून येते. जालना जिल्ह्यात एकूण 8

तालुके, 4 उपविभाग, 8 पंचायत समित्या व 781 ग्रामपंचायती आहेत. जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ 7728 चौ.कि.मी. आहे. जनगणना 2011 नुसार जिल्ह्याची लोकसंख्या 19,59,046 इतकी होती. यापैकी पुरुषांची लोकसंख्या 10,11,473 तर स्त्रियांची लोकसंख्या 9,47,573 इतकी आहे. जिल्ह्याची स्त्री-पुरुष प्रमाण (लिंग गुणोत्तर) 937 इतके आढळून आले आहे.

**जालना जिल्ह्यातील आरोग्य सेवा - सुविधांचा तपशील:**

तक्ता क्र. 1 नुसार असे निदर्शनास येते की, शासकीय आरोग्य सुविधांच्या बाबतीत जालना जिल्ह्यात एकूण 11 रुग्णालये, 9 दवाखाने, 40 प्राथमिक आरोग्य केंद्रे तर 215 उपकेंद्रे आढळून येतात. शासकीय रुग्णालये व दवाखान्यात 215 खाटा उपलब्ध असल्याचे दिसते. आरोग्य सोयी सुविधांच्या प्रमाणाचा व संख्येचा विचार केल्यास असे दिसते की, जालना व त्यानंतर भोकरदन व जाफराबाद या तालुक्यात आरोग्य सेवांचे जाळे अधिक सघन आहे तर इतर तालुक्यात ते विरळ असल्याचे दिसते. जालना जिल्ह्यातील लोकसंख्येच्या मानाने या सुविधा अत्यल्प असल्याचे दिसून येतात.

**तक्ता क्र. 1: जालना जिल्ह्यातील आरोग्य सेवा सुविधा**

| अ.क्र. | तालुका | शासकीय आरोग्य सुविधा | | | | खाजगी आरोग्य सुविधा | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रुग्णालयांची संख्या | दवाखाने | खाटांची संख्या | प्राथमिक आरोग्य केंद्रे | उपकेंद्रे | रुग्णालये | दवाखाने |
| 1 | भोकरदन | 1 | 2 | 78 | 8 | 37 | 26 | 39 |
| 2 | जाफराबाद | 2 | 1 | 84 | 4 | 21 | 0 | 47 |
| 3 | जालना | 3 | 2 | 326 | 6 | 30 | 130 | 106 |
| 4 | बदनापूर | 1 | 1 | 54 | 4 | 22 | 1 | 37 |
| 5 | अंबड | 1 | 0 | 86 | 6 | 34 | 20 | 41 |
| 6 | घनसावंगी | 1 | 2 | 60 | 5 | 27 | 0 | 55 |
| 7 | परतूर | 1 | 0 | 54 | 4 | 20 | 26 | 48 |
| 8 | मंठा | 1 | 1 | 48 | 3 | 24 | 16 | 31 |
| | **एकूण** | **11** | **9** | **790** | **40** | **215** | **219** | **404** |

**स्रोत:** जालना जिल्हा - सामाजिक व आर्थिक समालोचन, 2017

**तक्ता क्र. 2: जालना जिल्ह्यातील आरोग्य सेवा सुविधा (सांख्यिकीय तंत्र)**

| आरोग्य सुविधा (Health Facility) | एकूण संख्या (Sum) | सरासरी (Mean) (प्रति तालुका) | विस्तार (Range) (कमाल - किमान) | प्रमाण विचलन (Std. Deviation) |
|---|---|---|---|---|
| शासकीय रुग्णालये | ११ | १.३७ | ३ - १ | ०.७४ |
| शासकीय दवाखाने | ९ | १.१२ | २ - ० | ०.८३ |
| शासकीय खाटा | ७९० | ९८.७५ | ३२६ - ४८ | ८६.६६ |
| प्राथमिक आरोग्य केंद्रे | ४० | ५.०० | ८ - ३ | १.६० |
| उपकेंद्रे | २१५ | २६.८७ | ३७ - २० | ६.०८ |
| खाजगी रुग्णालये | २१९ | २७.३७ | १३० - ० | ४२.९० |
| खाजगी दवाखाने | ४०४ | ५०.५० | १०६ - २६ | २४.३० |
| खाजगी खाटा | ३९७४ | ४९६.७५ | २५४९ - ७५ | ८३२.५० |

शासकीय आरोग्य सेवा सुविधांच्या बरोबर जालना जिल्ह्यात खाजगी आरोग्य सोयी सुविधा मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. या सुविधांचे योगदान मोठ्या प्रमाणात आहे. जिल्ह्यात एकूण 219 रुग्णालये, 404 दवाखाने असून या दवाखाने व रुग्णालयांमध्ये एकूण 3974 इतक्या खाटा उपलब्ध आहेत. शासकीय आरोग्य सुविधेप्रमाणेच जालना तालुक्यात व शहरात खाजगी आरोग्य सुविधांचे प्रमाण व संख्या अधिक आहे. एकूण 219 रुग्णालये व 404 दवाखाने या पैकी जालना तालुक्यात 130 रुग्णालये व 106 दवाखाने दिसून येतात जे प्रमाण जिल्ह्यात सर्वाधिक आहे. हीच बाब खाटांच्या संख्येबाबतही लागू होते. जिल्ह्यात एकूण 3974 इतक्या खाटा आहेत. तर फक्त जालना तालुक्यात 2549 इतक्या खाटा आहेत जे प्रमाणही सर्वाधिक आहे.

**सरासरी (Mean)-** प्रत्येक तालुक्यात सरासरी १.३७ शासकीय रुग्णालये आणि ५ प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत. **प्रमाण विचलन (Standard Deviation/Variation):** शासकीय सुविधांचे वितरण बऱ्यापैकी समान आहे, परंतु खाजगी आरोग्य सुविधांमध्ये प्रचंड तफावत दिसून येते. विशेषतः खाजगी खाटांच्या (Beds) संख्येमध्ये मोठी असमानता आहे (Standard Deviation: ८३२.५), ज्यामुळे आरोग्य सुविधांचे असमान वितरण स्पष्ट होते. **असमानता:** जालना तालुक्यात खाजगी क्षेत्रातील **६४.१४%** खाटा आणि **५९.३६%** रुग्णालये एकवटलेली आहेत, ज्यामुळे इतर ७ तालुक्यांत या सुविधांची कमतरता स्पष्ट होते.

**जालना तालुक्याचे वर्चस्व - खाजगी खाटा:** जिल्ह्यातील एकूण ३९७४ खाजगी खाटांपैकी **२५४९ खाटा (सुमारे ६४.१%)** एकट्या जालना तालुक्यात आहेत. **खाजगी रुग्णालये:** जिल्ह्यातील एकूण २१९ खाजगी रुग्णालयांपैकी **१३० रुग्णालये (सुमारे ५९.३%)** जालना तालुक्यात आहेत. **शासकीय खाटा:** शासकीय खाटांचे प्रमाणही जालन्यात सर्वाधिक आहे (**४१.२%** - ७९० पैकी ३२६ खाटा). जालना जिल्ह्याच्या मुख्यालयी म्हणजे जालना शहरात मोठ्या प्रमाणात शासकीय व खाजगी या दोन्हीही प्रकारच्या आरोग्या सोयी सुविधा उपलब्ध असलेल्या दिसतात. जालना शहरात जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्हा महिला रुग्णालय आहेत तर खाजगी रुग्णालयांमध्ये दिपक रुग्णालय, जालना हॉस्पिटल, मिशन हॉस्पिटल, विवेकानंद हॉस्पिटल, ओम हॉस्पिटल, शतायु हॉस्पिटल, आधार हॉस्पिटल, वरकड हॉस्पिटल, आस्था हॉस्पिटल, संजिवनी हॉस्पिटल, झबड हॉस्पिटल, संतकृपा हॉस्पिटल, गणपती नेत्रालय अशी विविध मोठी, मल्टीस्पेशालिटी व दर्जेदार आरोग्य सुविधांनी युक्त हॉस्पिटल दिसून येतात.

**संदर्भ:**

1. जालना जिल्हा - सामाजिक व आर्थिक समालोचन, 1991, 2001, 2017.
2. प्रा. भगवान काळे - आपला जालना जिल्हा, साकेत प्रकाशन, जालना.
3. लोकराज्य : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
4. डॉ. व्ही. टी. घरपुरे : लोकसंख्या भूगोल पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.
5. प्रा. डॉ. जगदिश सिंह : संसाधन भूगोल, राधा पब्लिकेशन, नवी दिल्ली.